।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारूती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि १९ एप्रिल २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक १६ वा

# तीनपट पैसे देण्याच्या आमिषाने शेतकऱ्याची तब्बल ९ लाखांची फसवणूक

## सांगोला तालुक्यातील गायगव्हाण येथील घटना; सहा जणांविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल




सांगोला : तीनपट पैसे देण्याचे आमिष दाखवून एका शेतकऱ्याची तब्बल ९ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना सांगोला तालुक्यातील गायगव्हाण येथे घडली आहे. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध कायदेशीर तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत फिर्यादी शांतीलाल साळुंखे (वय ४८, व्यवसाय शेती, रा. गायगव्हाण, ता. सांगोला) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते पत्नी व मुलासह शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. सुमारे महिनाभरापूर्वी त्यांच्या भाच्याने ओळखीतील काही व्यक्ती पैसे गुंतवणूक केल्यास तीनपट करून देतात, अशी माहिती दिली होती. सुरुवातीला त्यांनी नकार दिला; मात्र कर्जबाजारीपणामुळे जमीन सोडवण्यासाठी पैशांची गरज असल्याने त्यांनी नंतर १० लाख रुपयांची व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी मुलगी व तिच्या सासूचे दागिने महुद येथील सराफाकडे गहाण ठेवून ९ लाख रुपये उभे केले. तसेच जावयाकडून ५० हजार रुपये ऑनलाईन घेतले व स्वतःकडील ५० हजार रुपये मिळून एकूण १० लाख रुपयांची रक्कम तयार केली.

दरम्यान, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी काही संशयित इसम महुद येथे आले व रात्री फिर्यादीच्या घरी जाऊन तीनपट पैसे करून देण्याचे आश्वासन दिले. त्यांनी बोलण्यात गुंतवून हातचलाखीने पैसे असलेली बॅग घेऊन त्यांच्या जागी बॉक्स ठेवून फसवणूक केली. नंतर बॉक्स उघडून पाहिल्यावर त्यामध्ये ५०० रुपयांच्या नोटांच्या आकाराचे कोरे कागद आढळून आले. यानंतर फिर्यादी व नातेवाईकांनी महुद येथे शोध घेतला असता काही संशयित व्यक्ती आढळून आल्या; मात्र त्यांचे इतर साथीदार पैसे घेऊन फरार झाले होते.

पुढे संबंधितांनी फोनद्वारे संपर्क साधल्यावर १ लाख रुपये ऑनलाईन पाठवले; परंतु उर्वरित रक्कम परत देण्याचे आश्वासन देऊन वेळकाढूपणा केल्याने अखेर संशयितांना पोलिस ठाण्यात आणण्यात आले.

या घटनेत यांनी मिळून फिर्यादीची सुमारे ९ लाख रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार दाखल करण्यात आली असून चंदु विठ्ठलराव आर्शिद रा. धामणकरनाका, कामतघर भिवंडी २) रमेश विष्णु दंडी रा. सोनारपाडा भिवंडी ३) सज्जन कोंडीबा पवार रा, खंडाळी ता. माळशिरस जि. सोलापूर ४) निलेश सिद्धे रा. कामत घर भिवंडी ५) मनोज सोनवणे रा. शेगाव, जि. बुलढाणा ६) एक अनोळखी इसम यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि वाघे हे करीत आहेत.

## माण नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक; बोलेरो पिकअप जप्त, आरोपी फरार

सांगोला : तालुक्यातील वाडेगाव येथील माण नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करण्यात आली असून संबंधित आरोपी फरार झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी पोहेकॉ/४८४ सुनील शिवाजी बनसोडे (नेमणूक सांगोला पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ७ वाजता वाडेगाव येथील माण नदी पात्रात घडली. आरोपी हा त्याच्या ताब्यातील महिंद्रा कंपनीचा बोलेरो पिकअप या वाहनामध्ये शासनाची कोणतीही रॉयल्टी न भरता व परवानगी न घेता अवैधरित्या वाळू उपसा करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीरपणे वाहतूक करताना आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचल्याचा संशय येताच आरोपी वाहन थांबवून तेथेच सोडून पळून गेला. याबाबत दि. १६ एप्रिल २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध बी.एन.एस. २०२३ चे कलम ३०३ (२) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ९ व १५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोना/१४२५ पाटील करीत आहेत.

## सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठी सर्व अर्ज मंजूर

सांगोला : तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांसाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन अर्जांची छाननी तहसील कार्यालयात पार पडली असून सर्व अर्ज मंजूर करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

दि.३० मार्च २०२६ रोजी ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकांची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार उमेदवारांकडून दि.०७ एप्रिल २०२६ ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत तहसील कार्यालय, सांगोला येथे नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आली होती. दि.१५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अर्जांची छाननी करण्यात आली. खवासपूर ग्रामपंचायतीच्या पोटनिवडणुकीसाठी एकच अर्ज प्राप्त झाला होता.

तसेच मौजे चिकमहूद व चिनके ग्रामपंचायतींसाठी प्रत्येकी दोन अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी प्रत्येकी एक उमेदवाराने अर्ज मागे घेतल्यामुळे प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक नामनिर्देशन पत्र शिल्लक राहिले आहे. त्यामुळे या ठिकाणी बिनविरोध निवड होणार आहे. दरम्यान, सरपंच पदासाठी थेट जनतेतून निवड होणाऱ्या अनकढाळ ग्रामपंचायतीसाठी एकूण ७ नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाली असून एकही उमेदवाराने अर्ज मागे घेतलेला नाही, अशी माहिती तहसील प्रशासनाने दिली.

## इंदापूर-विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील कडलास (लिगाडेवाडी) येथील रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी

सांगोला : इंदापूर-विजापूर राष्ट्रीय महामार्गावरील मौजे कडलास (लिगाडेवाडी) ता. सांगोला गाव हद्दीतील कडलास ते सांगोला या मार्गावरील रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी ग्रामपंचायत कडलास यांच्या वतीने विद्यमान आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, तहसीलदार व प्रांत अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.



सदर मार्ग अंदाजे १ किमी अंतराचा असून सध्या सिंगल लेन आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे निर्माण झाल्याने वाहतुकीस गंभीर अडथळा निर्माण होत आहे. ग्रामपंचायतीने याबाबत पत्रव्यवहार केल्यानंतर रस्त्याचे काम सुरू झाले असले, तरी ते अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लोकवस्ती असून सतत अवजड वाहनांची वाहतूक सुरू असल्यामुळे दुचाकीस्वार व परिसरातील नागरिकांना धुळीच्या प्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

वाढते तापमान आणि प्रदूषणामुळे आरोग्याच्या समस्या वाढत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. यामुळे कडलास गावातील ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी असून, सदर रस्त्याचे काम त्वरित पूर्ण न झाल्यास रास्ता रोको किंवा आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने रस्त्याची पाहणी करून काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा ग्रामपंचायतीने व्यक्त केली आहे.

निवेदन देताना सोलापूर दूध संघाचे संचालक मारुती लवटे, माजी उपसरपंच समाधान पवार, माजी उपसरपंच सुनील पाटील, गणपतराव देशमुख सहकारी सूतगिरणीचे व्हाईस चेअरमन ॲड.नितीन गव्हाणे, विकास सेवा सोसायटीचे संचालक अरुण वाघमोडे, राहुल पाटील, महादेव लेंडवे, अशोक ठोकळे, निलेश अनुसे, प्रशांत तेली आदी उपस्थित होते.

# मुक्त विचार

## विचारधन



“स्वाभिमानाने जगायला शिका. या जगात काहीतरी करून दाखवायचं आहे अशी महत्त्वाकांक्षा सदैव तुमच्याकडे असली पाहिजे.“

-डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## महात्मा बसवेश्वर : समता, श्रम आणि मानवतेचा अनंत दीप

भारतीय सामाजिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की त्यांनी आपल्या काळाच्या चौकटी मोडून पुढील अनेक शतकांसाठी विचारांचे दिशादर्शन केले. बाराव्या शतकातील कर्नाटकात जन्मलेले महात्मा बसवेश्वर (बसवण्णा) हे असेच एक क्रांतिकारी समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि लोकनेते होते. त्यांच्या जयंती निमित्त त्यांचे विचार केवळ स्मरणात ठेवण्याचा नव्हे, तर आजच्या सामाजिक वास्तवाशी जोडून नव्याने आकलन करण्याचा हा क्षण आहे. बसवेश्वरांचे कार्य केवळ धार्मिक सुधारणा किंवा आध्यात्मिक चळवळ म्हणून मर्यादित नव्हते; ते एक व्यापक सामाजिक क्रांतीचे प्रारूप होते. त्या काळात समाजात जात-पात, वर्णव्यवस्था, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचे प्राबल्य होते. उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाखाली सामान्य माणूस, विशेषतः शूद्र आणि स्त्रिया, अन्यायाच्या गर्तेत अडकले होते. अशा वेळी बसवेश्वरांनी ‘समता’, ‘स्वातंत्र्य’ आणि ‘बंधुता’ या मूल्यांवर आधारित एक नवा समाजव्यवस्थेचा आराखडा मांडला.

बसवेश्वरांच्या विचारांची मध्यवर्ती संकल्पना म्हणजे कायकवे कैलास म्हणजेच श्रम हीच पूजा. त्यांनी श्रमाला केवळ आर्थिक क्रिया न मानता त्याला आध्यात्मिक उंचीवर नेले. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते; प्रत्येक श्रमाला समान प्रतिष्ठा मिळाली पाहिजे, हा त्यांचा ठाम विश्वास होता. आजच्या काळातही ‘डिग्निटी ऑफ लेबर’ची जी चर्चा आपण करतो, ती बसवेश्वरांनी शेकडो वर्षांपूर्वी प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला होता. याचबरोबर त्यांनी दासोह ही संकल्पना मांडली म्हणजे आपल्या श्रमातून मिळालेल्या उत्पन्नाचा काही भाग समाजासाठी अर्पण करणे. ही केवळ दानधर्माची भावना नव्हे, तर सामाजिक न्यायाचा एक मार्ग होता. समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी, हा या विचाराचा गाभा आहे. आजच्या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतही या तत्त्वाची छाया दिसून येते.

बसवेश्वरांनी स्थापन केलेले अनुभव मंटप हे जगातील पहिले लोकशाही संसद मानले जाते. येथे समाजातील सर्व स्तरांतील लोक स्त्री-पुरुष, विविध जातींचे प्रतिनिधी एकत्र येऊन सामाजिक, धार्मिक आणि नैतिक विषयांवर मुक्तपणे चर्चा करत. या मंचावर स्त्रियांनाही समान स्थान होते, हे विशेष महत्त्वाचे आहे. त्या काळात स्त्रियांच्या शिक्षणावर आणि सहभागावर अनेक बंधने असताना बसवेश्वरांनी त्यांना विचार मांडण्याचे व्यासपीठ दिले. आजच्या लोकशाही व्यवस्थेचा बीजारोपण त्या काळातच त्यांनी केले होते, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. बसवेश्वरांचे आणखी एक महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी जातिव्यवस्थेला दिलेले आव्हान. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, माणसाची ओळख त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या कर्मावर आणि चारित्र्यावर ठरते. त्यांनी विविध जातींतील लोकांचे आंतरजातीय विवाह घडवून आणले, ज्यामुळे समाजात मोठी खळबळ उडाली. या कृतीतून त्यांनी सामाजिक बंधने मोडून काढण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न केला. आजही आंतरजातीय विवाहांना विरोध होतो, हे वास्तव पाहता बसवेश्वरांचे कार्य किती दूरदर्शी होते, हे लक्षात येते.

बसवेश्वरांचे विचार त्यांच्या वचने या काव्यरूपातून प्रकट झाले. ही वचने अत्यंत सोप्या, थेट आणि प्रभावी भाषेत मांडलेली आहेत. त्यात त्यांनी देव, धर्म, समाज आणि नैतिकता यांबाबतचे आपले विचार स्पष्टपणे मांडले. त्यांनी मूर्तिपूजा, कर्मकांड आणि अंधश्रद्धांचा निषेध केला आणि ईश्वराशी थेट नाते जोडण्यावर भर दिला. त्यांच्या मते, देव मंदिरात नसून प्रत्येकाच्या अंतःकरणात आहे. हा विचार आधुनिक मानवतावादी दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. आजच्या काळात बसवेश्वरांच्या विचारांची उपयुक्तता अधिकच वाढली आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आपण आधुनिकतेच्या उंबरठ्यावर उभे आहोत, पण सामाजिक विषमता, जातीय द्वेष, आर्थिक असमानता आणि नैतिक अधःपतन यांसारख्या समस्या अजूनही कायम आहेत. अशा वेळी बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान आपल्याला नव्या दिशेने विचार करायला भाग पाडते.

स्त्री-पुरुष समानतेच्या संदर्भातही बसवेश्वरांचे विचार आजही मार्गदर्शक ठरतात. त्यांनी स्त्रियांना शिक्षण, विचार मांडण्याचे स्वातंत्र्य आणि समाजातील समान स्थान दिले. आजही स्त्रियांच्या सुरक्षिततेचा, समान संधींचा आणि सन्मानाचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. त्यामुळे बसवेश्वरांचे स्त्रीसमानतेचे तत्त्वज्ञान अधिकच महत्त्वाचे ठरते. बसवेश्वरांनी धर्माला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी धर्माचा उपयोग माणसाला विभाजित करण्यासाठी नव्हे, तर एकत्र आणण्यासाठी केला. आजच्या काळात धर्माच्या नावाखाली निर्माण होणाऱ्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. धर्म म्हणजे करुणा, प्रेम आणि सहिष्णुता हा संदेश त्यांनी दिला. बसवेश्वर जयंती हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण त्यांच्या विचारांचे कितपत पालन करतो, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. समाजात समता, न्याय आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी आपण काय करतो, याचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

आज गरज आहे ती बसवेश्वरांच्या विचारांना केवळ भाषणांपुरते मर्यादित न ठेवता ते प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याची. शिक्षण, प्रशासन, राजकारण आणि सामाजिक क्षेत्रात त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास समाज अधिक न्याय्य आणि समताधिष्ठित होऊ शकतो. शेवटी, बसवेश्वरांचे जीवन आणि कार्य आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते. समाज बदलण्यासाठी केवळ विचार पुरेसे नसतात, तर त्यासाठी कृतीचीही आवश्यकता असते. त्यांनी आपल्या आयुष्यातून हे सिद्ध केले की, एक व्यक्तीही समाजात मोठा बदल घडवू शकते. महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना, त्यांच्या विचारांचा दीप आपल्या मनात प्रज्वलित ठेवण्याचा संकल्प करूया. समता, श्रम आणि मानवतेच्या मूल्यांवर आधारित समाज निर्माण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**-प्रविण बागडे,नागपूर**

## कठोर परिश्रमाचं... धैर्यवान व्यक्तिमत्त्व: डॉ. बाबासाहेब आंबेडकर

तुम्ही कोण आहात, कुठून आला आहात हे तितकं महत्त्वाचं नाही, प्रत्येक मनुष्य त्याची क्षमता वापरू शकतो, जसे डॉ. आंबेडकरांनी स्वतःच्या आयुष्याची उंची गाठली आणि भारत देशाचे संविधान लिहून सर्वसामान्यांना त्यांचा हक्क मिळवून दिला हे विधान होते अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामाचे. भारताच्या पार्लमेंटला संबोधित करताना

वापरलेले त्यांचे हे शब्द बाबासाहेबांच्या आंतरराष्ट्रीय सर्वमान्यतेचीही साक्ष पटवून देतात.

ज्या काळात बाबासाहेब, समाजविश्वामध्ये आपल्या चिंतनाच्या साहाय्याने समोर येणाऱ्या हरएक समस्येला बाजूला करत जात होते, अगदी त्याच वेळी वैयक्तिक जीवनात आलेलं दुःख किंवा विविध स्वरूपाच्या अडीअडचणींचं भांडवल न करता त्यांनी कठोर परिश्रम घेत देशातल्या तमाम ओबीसी आणि दलित वर्गाला त्यांचा न्यायहक्क मिळवून देण्यासाठी अविरत

संघर्ष केला. हा संघर्ष साधासुधा नव्हता. त्या वेळी देशात असलेले पुढारी देशस्वातंत्र्याच्या चळवळीला महत्त्व देत होते.

मात्र बाबासाहेबांना देश स्वातंत्र्यासह देशातल्याच करोडो जनतेच्या अस्तित्व स्वातंत्र्याचाही सवाल सतावत होता. माणसाला माणसासारखं जगू दिलं जात नव्हतं. अस्पृश्यता पाळणारी विकृत माणसं टोळ्याटोळ्यांनी समाजात बिनधास्त वावरत होती. या अशा दडपलेल्या, नाकारलेल्या, अन्यायग्रस्त समाजाचा एक बुलंद असा आवाज त्या काळी फक्त आणि फक्त डॉ.भीमराव रामजी आंबेडकर एवढाच आणि इतकाच होता. २००७ मध्ये, नोबेल पारितोषिक विजेते ख्यातनाम अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन म्हणाले होते की, डॉ. आंबेडकरांना मी माझ्या अर्थशास्त्राच्या ज्ञानाचा पितामह मानतो. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अर्थशास्त्रासह इतिहास, मानववंशशास्त्र, गणित, भूगोल, स्थापत्यकला, संगीत, राज्यशास्त्र, धर्मचिकित्सा, वाङ्मय, तत्त्वज्ञान या आणि अशा कित्येक ज्ञानशाखांमधे सखोल ज्ञानसुद्धा मिळवले होते.

अमेरिकेत कोलंबीया विद्यापीठात अभ्यास करताना रोजचा संघर्ष भयानक असा होता.

शिष्यवृत्तीचे पैसे पुरत नसल्यामुळे कधी उपाशी तर कधी अर्धपोटी त्यांना त्यांचा रोजचा दिवस पुढे ढकलावा लागत असे. रोजच्या अन्नात एक कप कॉफी, दोन केक, एक बशी सागुती किंवा मासे, असा आहार मिळत असे. आहे ते पैसे खर्च करण्याची अगदीच मुभा नव्हती. कारण मिळालेल्या याच शिष्यवृत्तीच्या पैशातून घरी रमाबाईंना घरखर्चाला पैसे पाठवावे लागत असत. या काळात बाबासाहेब दररोज अठरा अठरा तास अभ्यास करायचे. दि इव्हॅल्यूएशन ऑफ प्रोव्हीश्नल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया हा त्यांचा प्रबंध त्यांनी प्रेमापोटी आणि कृतज्ञेपोटी सयाजीराव गायकवाड यांना अर्पण केला. या ग्रंथाला बाबासाहेबांचे गुरू सेलिग्मन यांनी प्रस्तावना लिहिली होती. त्यात त्यांनी आवर्जून एका बाबीचा उल्लेख केला होता, ते म्हणाले की, आंबेडकरांनी घेतलेला हा विषय आतापर्यंत अनेक विचारवंतांच्या अभ्यासाचा विषय राहिलेला आहे, मात्र या विषयाचा इतका सखोल आणि सांगोपांग अभ्यास अन्य कोणी केल्याचे मला माहीत नाही. पुढे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲन्ड पॉलिटिकल सायन्समध्ये अभ्यास करतानादेखील उपाशी राहून बाबासाहेब पैसे वाचवत आणि ग्रंथ खरेदी करत असत.

दूरवर असणाऱ्या लायब्ररींमधून दुर्मीळ ग्रंथ वाचण्यासाठी ते कित्येक मैल पायीच चालत जात असत. याच काळात ज्या ठिकाणी ते राहायचे तिथे त्यांना सकाळी नाष्ट्याला एक चहा, एक पावाचा तुकडा, त्या तुकड्याच्या टोकाला थोडासा जाम मिळायचा. त्यांच्या त्या बलदंड शरीराला तेवढं अन्न निश्चितच खूप अपुरं असायचं. मात्र बाहेरून हॉटेलमधून खाण्यासाठी जवळ पैसे नसायचे. तरी कधी कधी लंडन म्युझियममधे वाचनासाठी जातांना सॅन्डवीचचे दोन तुकडे सोबत नेत. मात्र लायब्ररी प्रशासनाने नियमाचा हवाला देऊन इथं काही खाता येणार नाही,असं सांगितल्यावर बाबासाहेबांनी सॅन्डवीच सोबत नेणंही बंद करून टाकलं आणि उपाशीपोटीच तासन तास अभ्यासासाठी स्वतःला झोकून दिलं. त्यांचे खिसे नेहमीच नोट्सने भरलेले असायचे. त्याच दिवसांमध्ये रात्रीच्या जेवणातही एक ग्लास बॉव्हरील सोबत दोन बिस्किटे, तर त्यांच्या एका गुजराती मित्राने आणलेले पापड बाबासाहेब कुठल्याशा पत्र्यावर भाजून खायचे आणि पुन्हा मध्यरात्रीपर्यंत अभ्यास सुरूच राहायचा.

अपयशाने खचून जाणा-या प्रत्येक युवक-युवतीने नेहमी एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, सलग दोन वर्षं उपाशीपोटी राहून बाबासाहेबांनी चार वर्षांचा अभ्यासक्रम केवळ दोनच वर्षांत पूर्ण केला होता. कुठलंही व्यसन नाही, कुठला शॉर्टकट नाही. केवळ संघर्ष, संघर्ष आणि कठोर संघर्ष बस्स! हेच त्यांच्या जीवनाचं प्रतिबिंब होतं. आपलं राहणीमान असेल, भाषा प्रभुत्व असेल, या अशाही बाबींना त्यांनी त्यांच्या जीवनात अत्यंत महत्त्व दिलं होतं. पुढे विद्यार्थ्यांसमोर बोलण्याचेज्या ज्या वेळी प्रसंग आले, त्या वेळी त्यांनी भाषा प्रभुत्व आणि वक्तृत्व गुणाच्या विकासासाठी ते भरभरून बोलायचे. बाबासाहेबांच्या इतर विविध गुणांप्रमाणेच ‘स्वच्छता’ आणि ‘शिस्त’ या दोन शब्दांची झलक त्यांच्या प्रत्येक घटनेमध्ये, कृतीमध्ये प्रत्येक दिवशी सगळ्यांना दिसायची.

अगदी विद्यार्थीदशेपासूनच चारित्र्य या शब्दाला त्यांनी अधिक महत्त्वाचे स्थान दिले होते. ते नेहमी म्हणत की, ‘माझे दुश्मन मला घाबरतात त्यामागचं कारण हे नाही, की माझ्याकडे देश-विदेशातल्या मोठमोठ्या पदव्या आहेत. माझे दुश्मन मला घाबरतात याचं कारण हेही नाही, की माझा विविध विषयांचा व्यासंग वा माझ्यामागे लाखोंचा जनसमुदाय आहे तर माझे दुश्मन मला यामुळे घाबरतात की माझ्याकडे ‘कॅरेक्टर’ आहे, चारित्र्य आहे.

त्यांचं ग्रंथप्रेम तर सर्वश्रुत होतंच. त्या काळी विद्वान समजले जाणारे मदन मोहन मालवीय यांनी तर बाबासाहेबांना त्यांचं पुस्तक संग्रहालय मला अगदी दीड लाखापेक्षाही अधिक किमतीत देऊन टाका, म्हणून विनंती केली होती. मात्र पुस्तकावर जिवापाड प्रेम करणाऱ्या आंबेडकरांनी स्पष्ट नकार दिला होता. बाबासाहेबांच्या निधनाच्या दुसऱ्या दिवशी लंडन टाइम्स या वृत्तपत्राने लिहिलं होतं, ब्रिटिश सत्तेच्या शेवटच्या काळातीलभारतातील सामाजिक आणि राजकीय उत्क्रांतीचा जेव्हा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा त्यात आंबेडकरांच्या नावाचा प्रामुख्याने निःसंशय उल्लेख होईल. निर्धार आणि धैर्य ह्या भरदार व्यक्तिमत्त्वाच्या महान पुरुषाच्या मुखावर कोरलेले होते.अशा या महामानवास जयंती निमित्त विनम्र अभिवादन !!

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com

संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-२५ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला दापोली बसमुळे शेतकरी आणि पर्यटकांची सोय- दिपकआबा साळुंखे-पाटील
## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी सांगोला आगारातून सांगोला दापोली बसची सुरुवात



सांगोला : सांगोला तालुक्यातील अनेक शेतकरी आपल्या शेतीत नवनवीन प्रयोग करण्यासाठी मार्गदर्शन मिळावे म्हणून तसेच नवनवीन विकसित केलेली संकरित फळझाडे आणण्यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे जात असतात तसेच सांगोला तालुक्यातील हजारो पर्यटक कोकणात निसर्ग दर्शन घ्यायला जात असतात सांगोल्यातून दापोलीला जाणाऱ्या शेतकरी आणि पर्यटकांची सांगोला दापोली या नवीन बासमुळे चांगली सोय होईल,असा विश्वास माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केला.
भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी सांगोला आगारातून माजी आमदार दिपकआबा यांच्या हस्ते सांगोला ते दापोली ही नवीन बस सुरू करण्यात आली. या बसचे उद्घाटन प्रसंगी दिपकआबा बोलत होते. यावेळी भाजपचे शिवाजीराव गायकवाड, माजी नगराध्यक्ष नवनाथ पवार, आगारप्रमुख विकास पोफळे, शहीद अशोक कामटे संघटनेचे अध्यक्ष निलकंठ शिंदे यांच्यासह सर्व पदाधिकारी तसेच आगारातील अधिकारी, कर्मचारी व मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी आमदार दिपकआबा म्हणाले, सततच्या दुष्काळी परिस्थितीमुळे सांगोला तालुक्यातील शेतकरी हा कष्टाळू आणि प्रयोगशील बनला आहे. त्यामुळेच सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांनी डाळींब शेतीतून क्रांती केली.

आज सांगोला तालुक्यात डाळींब द्राक्षे आंबा पेरू तसेच अन्य फळ पिकांच्या बागा दिमाखात उभ्या आहेत यामध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली या कृषी विद्यापीठाचे महत्त्वाचे योगदान आहे. तसेच सांगोला तालुक्यातील पर्यटकांना नेहमीच कोकणचा नयनरम्य निसर्ग भुरळ घालत असतो त्यामुळे सांगोला तालुक्यातील शेतकरी आणि पर्यटकांचे दापोली आणि संपूर्ण कोकणाशी अतूट नाते निर्माण झाले आहे हेच नाते अधिक घट्ट आणि दृढ करण्यासाठी सांगोला आगाराने सुरू केलेली सांगोला दापोली ही बस निश्चितपणे मदत करेल,असा विश्वास शेवटी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी व्यक्त केला.

# जिल्हा नदी संवर्धन समूहाच्या वतीने मांडल्या जिल्ह्यातील नद्यांच्या समस्या



सांगोला : सोलापूर जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सोलापूर जिल्हा नदी संवर्धन समूहच्यावतीने जिल्हाधिकारी कार्तिकीयन तसेच जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी याना प्रत्यक्ष भेटून जिल्ह्यातील नद्यांची झालेली दुरावस्था व त्यावरील विविध विभागाच्यावतीने अपेक्षित उपाय यावर दोन्ही जिल्हाप्रमुखासमोर जिल्ह्यातील नद्यांच्या वेदना मांडल्या. सोलापूर जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात दहा जलदूत व त्यावर एक जलप्रेमी असे १२० हून अधिक कार्यकर्ते सामाजिक कार्याच्या माध्यमातून स्थानिक नद्या, पाणी, पर्यावरण यावर काम करत आहेत. परंतु दिवसेंदिवस नद्यांची अवस्था अधिक बिकट होत चालली आहे. जिल्ह्यातील सर्वच लहान मोठ्या नद्या अखेरच्या घटका मोजता आहेत. यावर वेळीच लक्ष नाही दिले तर जीव-जंतू पासून मनुष्य, प्राण्यांच्या जगण्याची व्यवस्थाच बिघडून जाईल असे मत नदी संवर्धन समूहाचे प्रतिनिधी वैजिनाथ घोंगडे यांनी मांडली.

महसूल विभागाच्यावतीने नद्या ओढ्यातील अतिक्रमणे काढली, नदीपात्र स्वच्छ ठेवले आणि अवैध वाळू उपशावर प्रतिबंधनात्मक उपाययोजना केली तर प्रत्येक नदी ८० टक्के पुनर्जीवित होईल. असे मत मांडण्यात आले. जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी नदी विकासाबाबत लक्ष घालण्याचे मान्य केले. तसेच या समूहाच्या वतीने जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांची भेट घेऊन त्यांच्यापुढेही नद्यांचा प्रश्न गांभीर्याने मांडला.

अशा प्रकारच्या नदीविषयक विविध मागण्याचे निवेदन जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सोलापूर यांना देण्यात आले. तत्पूर्वी नव्याने रुजू झालेले जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांना शाल, टोपी व पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनाही मानाची टोपी घालून शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिवाजीराव पवार, अनिल नारायण पेठकर, वैजिनाथ घोंगडे, दत्ता पाटील, हनुमंत कादे, प्रवीण तळे, इसाक शेख, श्रीनिवास गंगणे, संजय पोळ, गणेश जाधव, सिद्धांत बाबरे इ.सह जिल्ह्यातील विविध तालुक्याचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# सांगोला येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य -दिव्य स्मारक आकर्षक फुलांची सजावट ,विद्युत रोषणाईने उजळून निघाले

सांगोला : सांगोला शहर व तालुक्यात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती पंचशील ध्वजारोहण, पूर्णाकृती पुतळा, प्रतिमा पूजन, पुष्पहार अर्पण करीत संविधान वाटप, रॅली मिरवणूकीद्वारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो.,जय भीम.. च्या घोषणा देत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

दरम्यान सांगोला शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य -दिव्य स्मारक आकर्षक फुलांची सजावट ,विद्युत रोषणाईने उजळून निघाले होते. सोमवारी मध्यरात्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला सामुदायिक पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी भीम बांधवांनी नयनरम्य फटाक्याची आतिषबाजी करीत घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता तर मंगळवारी सकाळ पासूनच दिवसभर महामानवाला सामुदायिक



पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यासाठी स्मारकाच्या ठिकाणी भीम अनुयायीसह जनसागर लोटला होता.

सांगोला भीमनगर बुद्धविहार येथे डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील, शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत, नगराध्यक्ष आनंदा माने आदी मान्यवरांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण व प्रतिमापूजन करण्यात आले.

तसेच माजी आमदार ॲड.शहाजीबापू पाटील,माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, सौ.राणीताई माने, जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब लवटे, उपसभापती अजय सरगर, तानाजी पाटील, खरेदी विक्री संघाचे चेअरमन रमेश जाधव, सागर पाटील, उद्योजक योगेश खटकाळे, बाळासाहेब आसबे, आरपीआयचे तालुकाध्यक्ष खंडू सातपुते, युवा सेनेचे गुंडा खटकाळे, सोमेश यावलकर यांच्यासह शिवप्रेमी मंडळ, महात्मा बसवेश्वर युवक संघटना, आपुलकी प्रतिष्ठान, मुस्लिम संघटना पदाधिकारी, धनगर समाजसेवा मंडळ पदाधिकारी , विविध बहुजन समाज संघटना पदाधिकारी आंबेडकर प्रेमी यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष ॲड.आनंद बनसोडे, उपाध्यक्ष ॲड.सुरेश बनसोडे, वैभव भोरकडे, विकास बनसोडे , अशोक वाघमारे व राजू माने, सचिव सुभाष बनसोडे, खजिनदार रणजीत बनसोडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी ,सदस्य यांच्यासह बौद्ध बांधव यांनी जयंतीसाठी विशेष परिश्रम घेतले.

# सांगोला फॅबटेक कॉलेज आणि स्मार्ट ब्रिज मध्ये सामंजस्य करार

सांगोला : फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालय सांगोला आणि स्मार्ट ब्रिज सोबत दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांनी दिली.

फॅबटेक इंजिनिअरिंग कॉलेज मध्ये सचिन मस्के यांचे कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागात द्वितीय व तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी उद्योगातील सध्याच्या गरजा, कौशल्य विकास आणि करीअर संधी: या विषयावर विशेष संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचीउल्लेखनीय बाब म्हणजे, दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या करारा वर महाविद्यालयाच्या वतीने उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर यांनी स्वाक्षरी केली होती. या करारा अंतर्गत महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधारित शिक्षण कार्यक्रम १० एप्रिल २०२६ रोजी या करारासंदर्भात विद्यार्थ्यांसोबत संवाद साधण्यात आला.

या कार्यक्रमासाठी कार्यक्रमासाठी कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागातील डॉ. तृप्ती बनसोडे यांनी सिंगल पॉईंट ऑफ कॉन्टॅक्ट (एसपीओसी) म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. याशिवाय संगणक विभागप्रमुख डॉ. तानाजी धायगुडे यांचे सहकार्य लाभले.

या कार्यक्रमास आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सोमनाथ ठिंगळे आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. धनंजय शिवपुजे उपस्थित होते. दरम्यान संवाद सत्रांमध्ये महाविद्यालयाने राबविलेल्या अनुभवाधारित शिक्षण उपक्रमाचे विशेष कौतुक सचिन मस्के यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या सहभाग, प्रात्यक्षिक कौशल्ये व नवोन्मेषी दृष्टिकोनाचेही अभिनंदन केले.

# प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुल लाभार्थींना मोफत वाळू वाटप कार्यक्रम संपन्न

सांगोला : केंद्र शासनाच्या सर्वांसाठी घरे या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत घरकुल मंजूर लाभार्थींना राज्य शासनाच्या महसूल विभागामार्फत मोफत वाळू देण्याचा निर्णय घेण्यात आला असून या निर्णयाची अंमलबजावणी सांगोला तालुक्यात सुरू झाली आहे. दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी मौजे मेडशिंगी येथील कोरडा नदीपात्रातून घरकुल लाभार्थींना प्रत्येकी २ ब्रास प्रमाणे मोफत वाळू वाटप कार्यक्रम सांगोला येथील तहसीलदार बाळूताई भागवत, सांगोला पंचायत समितीच्या सभापती सौ.



पुनमताई इंगवले, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. वसंत फुले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

मेडशिंगी येथील कोरडा नदीपात्रातील घाटावरून सध्या १४९ लाभार्थींना प्रत्येकी २ ब्रास याप्रमाणे वाळूचा कोटा मंजूर करण्यात आलेला आहे. या उपक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी प्रत्यक्ष १० लाभार्थींना प्रत्येकी २ ब्रास प्रमाणे वाळू वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमास मेडशिंगी गावचे सुपुत्र डॉ. सुदर्शन इंगवले, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच मेडशिंगी, आलेगाव व वाकी घेरडी येथील सर्व सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी, घरकुल लाभार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगोल्यात ५३ हजारांहून अधिक रेशनकार्ड मोबाईलशी लिंक; उर्वरितांना तातडीचे आवाहन

सांगोला : सांगोला तालुक्यातील ७६ हजार ७२८ शिधापत्रिका धारकांपैकी ५३ हजार ०८० शिधापत्रिका धारकांनी रेशन कार्डला मोबाईल नंबर लिंक केला आहे. तर २३ हजार ६४८ शिधापत्रिका धारकांनी अद्यापही रेशन कार्डला मोबाईल नंबर लिंक केला नाही.अशा नागरिकांनी तातडीने आधार क्रमांक रेशन कार्डशी जोडावेत, असे आवाहन तहसीलदार श्रीमती बाळूताई भागवत यांनी केले आहे.

कोणतेही कुटुंब अन्नधान्यापासून वंचित राहू नये यासाठी शासनाकडून स्वस्त धान्य दुकानातून रेशनचे वितरण केले जाते. मात्र, नवीन




नियमानुसार रेशन कार्डशी आधार क्रमांक जोडणे आवश्यक आहे.मागील दोन वर्षांपासून तहसील प्रशासनाच्या पुरवठा विभागाकडून ही मोहीम सुरू केली आहे.

दरम्यान सांगोला तालुक्यातील २ हजार ९९१ अंत्योदय शिधापत्रिका धारकांपैकी २ हजार २४३ शिधापत्रका धारकांनी रेशन कार्डला मोबाईल नंबर लिंक केला आहे. ४१ हजार ०९० प्राधान्य कुटुंब म्हणजेच पात्र केशरी शिधापत्रिकाधारकांपैकी ३३ हजार ४२९ शिधापत्रिका धारकांनी रेशन कार्डला मोबाईल नंबर लिंक केला आहे. २५ हजार ८२९ अपात्र केशरी शिधापत्रिका धारकांपैकी १५ हजार ३९९ शिधापत्रिका धारकांनी रेशन कार्डला मोबाईल नंबर लिंक केला आहे. ६ हजार ८१६ शुभ्र शिधापत्रिका धारकांपैकी २ हजार ००९ शिधापत्रिका धारकांनी रेशनकार्डला मोबाईल नंबर लिंक केला आहे. रेशनच्या धान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी पुरवठा विभागाने चोख उपाययोजना करण्यासाठी रेशन कार्डला मोबाईल नंबर लिंक करण्याच्या सूचना शिधापत्रिका धारकांना दिल्या आहेत.

रेशन दुकानांवर धान्य आल्याचा व दुकानावरून धान्य घेतल्याचा मेसेज संबंधित लाभार्थ्यांच्या मोबाइलवर येणार आहे. त्यासाठी रेशन दुकानात आधारकार्ड आणि मोबाइल क्रमांकाची नोंदणी करणे आवश्यक आहे. सोबतच रेशन दुकानांमध्ये बायोमेट्रिक यंत्रणा कार्यान्वित केली असून, कोणत्या गोदामातून रेशन दुकानात किती धान्य पाठविले, तसेच दुकानातून किती आणि कधी धान्य उचलले, याची माहिती रेशनकार्ड धारकांच्या मोबाइलवर एसएमएसने देण्यात येणार असल्याचे पुरवठा शाखेकडून सांगितले.